# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ
## परिपत्रक

क्रमांक - संगाबाअवि/१/१०९१२-२४७/२०२१ दिनांक - ०१.६.२०२१

**विषय - राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९)चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय......**

संदर्भ - १) महाराष्ट्र शासन, महसुल व वने, आपत्ती व्यवस्थापन, व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील सूचनापत्र (Break the Chain) क्रमांक DMU/2020/CR.92,DisM-1, दि.३०.०५.२०२१.

२) जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-७९२/२०२१, दि.३१.०५.२०२१

महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्र.१ व २ वरील आदेशानुसार कोवीड-१९ च्या प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी विहीत केलेले निर्देश दि.१ जुन , २०२१ च्या सकाळी ७.०० पासून पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

त्यानुषंगाने विद्यापीठातील प्रशासकीय कामकाजासंदर्भात दिनांक १ जुन, २०२१ ते पुढील आदेशापर्यंत या कालावधीकरिता खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहे.

१) विद्यापीठातील प्रशासकीय व शैक्षणिक विभागाच्या नियंत्रण अधिकाऱ्यांनी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना कार्यालयीन कामकाजाकरीता विभागातील कर्मचाऱ्यांच्या २५ टक्के संख्या ग्राह्य धरुन विभागातील कर्मचाऱ्यांना बोलवावे.

२) नियंत्रण अधिकारी यांनी अधिकारी/कर्मचाऱ्यांना गरजेनुसार दररोज विभागात कामाकरीता बोलाविण्यात येणार असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची यादी उपकुलसचिव (आस्था.) यांना न चुकता सादर करावी.

३) अत्यावश्यक सेवा (आरोग्य केंद्र, सुरक्षा विभाग, अभियांत्रिकी विभाग पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा, उद्यान विभाग व इतर सेवा) पुरविणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखांनी याबाबत त्यांचे स्तरावर योग्य ते नियोजन करावे.

४) कर्मचाऱ्यांनी कार्यालयात येतांना विद्यापीठाने दिलेले ओळखपत्र सोबत ठेवावे.

५) प्रशासकीय व शैक्षणिक विभागामध्ये २५ टक्के उपस्थितीच्या अधीन बोलाविण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या जवळ विद्यापीठाचे ओळखपत्र नसल्यामुळे व संचारबंदीमुळे कार्यालयात येणास अडचण येत असल्यास विभाग प्रमुखांनी आपल्या स्तरावर अधीनस्त कर्मचाऱ्यांना कार्यालयात बोलाविण्यासंदर्भात पत्र द्यावे.

आदेशान्वये-

स्वा/-
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रत माहिती करीता सविनय सादर-**

१) मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.
२) मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, अमरावती

**प्रतीलिपी माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता**

१) सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख/प्रशासकीय अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
२) प्रमुख, संगणक केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक सहपत्रासह विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे.

उपकुलसचिव (प्रशा.)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

2/Data2/2021/PWR/Korder pmd(25)

# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ

## परिपत्रक

क्रमांक - संगाबाअवि/१/१०९२-२१८/२०२१ दिनांक - ०१ .६.२०२१

**विषय - राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड-१९)चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय......**

संदर्भ - १) महाराष्ट्र शासन, महसुल व वने, आपत्ती व्यवस्थापन, व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील सूचनापत्र (Break the Chain) क्रमांक DMU/2020/CR.92,DisM-1, दि.३०.०५.२०२१.

४) जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-७९२/२०२१, दि.३१.०५.२०२१

उपरोक्त संदर्भ क्र.२ वरील आदेशान्वये जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दि.०१/०६/२०२१ ते पुढील आदेशापर्यंत संचारबंदीचे आदेश निर्गमित केले असून त्याची प्रत सोबत जोडली आहे. त्यानुषंगाने अमरावती जिल्ह्यातील सर्व संलग्नित महाविद्यालयांनी नोंद घेऊन आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावर करावी.

तसेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिक्षेत्रातील इतर जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी यांनी सदर संबंधी आदेश निर्गमित केल्यास त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

आदेशान्वये-

सहपत्र - संदर्भ क्र.१ व २ वरील आदेश

स्वा/-
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रत माहिती करीता सविनय सादर-**

१) मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य- पुणे-१

**प्रतीलिपी माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता**

१) प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
२) प्र.संचालक, मॉडेल डिग्री कॉलेज, बुलडाणा.
३) उपकुलसचिव (मवि), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक सर्व संलग्नित महाविद्यालयांच्या निदर्शनास आणावे.

उपकुलसचिव (प्रशा.)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ